नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०४/२०२५ (मंगळवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ८० लाख ९० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,भिवापुर पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २२/०४/२०२५ रोजी भिवापुर पोलीस यांनी गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त करीत, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रमांक १**:— पोलसांनी मौजा साईधाम जवळ भिवापूर येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्रमांक एम.एच ४० सि.टी ९२४१ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती होती. चालक आरोपी **नामे जावेद हमिद खान, वय ४० वर्षे, रा रोशन बाग खरबी नागपूर जि. नागपुर,** हा मिळुन आल्याने त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक **नासिर हासिब खान, रा.खरबी नागपूर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** ट्रक क्रमांक एम.एच ४० सि.टी ९२४१ **आणि त्यामधुन ८ ब्रास रेती असा असा एकुण ४०,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रमांक २** :— पोलीसांनी मौजा मेंढा फाटा, नक्षी रोड येथे नाकाबंदी केली असता ट्रक **क्रमांक एम.एच ४० सि.एम. ००७३** हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती होती. चालक आरोपी **नामे मोहम्मद आफताब मोहम्मद निजाम, वय ४५ वर्षे, रा. हसनबाग, नागपुर जि. नागपुर,** हा मिळुन आल्याने त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता **वाहन मालक विजय श्रीकृष्णा क्षीरसागर रा.कमला नगर,वाडी, नागपूर** याच्या सांगण्यावरून चालकाने अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** ट्रक क्रमांक एम.एच ४० सि.एम.

००७३ **आणि त्यामधुन १० ब्रास रेती असा असा एकुण ४०,५०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाईमध्ये एकुण ८० लाख ९० हजारांचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम ,कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. **दोन्ही चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**



## कत्तलीकरीता विक्री करण्याच्या उद्देशाने शेतात जनावरांना बांधुन ठेवणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, १५ जनावरांची सुटका

**पोलीस स्टेशन खापा :—** दिनांक २१/०४/२०२५ रोजी रात्री खापा पोलीसांना माहिती मिळाली की, कोणीतरी अज्ञात इसमाने वाकी शिवारातील सोपान धोटे यांच्या शेतात कत्तलीकरीता विक्री करण्याचे उद्देशाने गोवंश जनावरे बांधुन ठेवली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस तात्काळ घटनास्थळी गेले असता सोपान धोटे यांच्या पिक नसलेल्या शेतात धुऱ्यावर अंधारात झाडाझुडपामध्ये पोलीसांना **१५ गोवंश जनावरे (बैल)** दोरखंडाने बांधुन, चारापाण्याची व्यवस्था न करता मिळुन आले. तसेच जनावरांची सुरक्षा व देखभाल करीता कोणीही हजर मिळुन आले नाही.पोलीसांनी पंचनामा करून **नमुद १५ गोवंश जनावरांना ताब्यात घेवुन जनावरांच्या सुरक्षा व देखभालीसाठी त्यांना राउळगाव येथील गोशाळेत दाखल केले.**

सदर प्रकरणी अज्ञात आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन खापा येथे कलम ११ (१) (डी) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सह कलम ५ (ए), ९ महा. प्राणी सुरक्षा अधिनियम कलम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने